# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. सआजीद /एसआर/ / वसाहत दि…………….

महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) अन्वये सुनावणीचे अंतिम आदेश

सहाय्यक आयुक्त जी / दक्षिण
यांचे कार्यालय १ ला मजला,
ना.म.जोशी मार्ग,
धनमिल नाका, मुंबई – ४०० ०१३.

प्रति,
श्री. गंगाराम विरय्या बोगा
इमारत क्र. २, सदनिका / गाळा क्र. ६०१
गोमाता जनता एस.आर.ए.सह.गृह.संस्था (मर्या.)
लोअर परेल, मुंबई – ४०० ०१३.

**विषय** : - झोपडपट्टी पुर्नवसन योजना
गोमाता जनता एस.आर.ए.सह.गृह.संस्था (मर्या.) वरळी, मुंबई
या संस्थेतील सदनिका / गाळयामध्ये बेकायदेशीर घुसखोरी केलेल्या व्यक्तिवर
निष्कासनाची कारवाई करण्याबाबत सुनावणीचे अंतिम आदेश

**संदर्भः**- १. क्र.झोपुप्रा/तह-१(वि.क)/२२/कावि – ४६२२३ / ४६६६८ दि.१८/११/२०२२
२. सहाय्यक आयुक्त जी/द/एसआर/४३०७०४/वसाहत दि.२३.११.२०२२ कारणे दाखवा नोटीस
३. प्रथम सुनावणीचे पत्र क्र. सआजीद/एसआर/७३६/वसाहत दि.३०.११.२०२२
४. सहाय्यक निबंधक झोपुप्रा यांना पाठविलेले पत्र क्र. सआजीद/एसआर/७०८/ववअ दि.२३.११.२०२२
५. सहाय्यक निबंधक झोपुप्रा यांच्या कार्यालयाचे प्राप्त पत्र क्र.सआजीद/E/४३२९८८/ वसाहत दि. २९.११.२०२२
६. कारणे दाखवा नोटीस अर्जदार यांचे उत्तर क्र. सआजीद/E/४३२२९७/वसाहत दि. २५.११.२०२२
७. द्वितीय सुनावणीचे पत्र क्र. सआजीद/एसआर/७७४/वसाहत दि.०७.१२.२०२२

"महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम" १९७१ (सुधारित व अद्ययावत) तसेच दि. २३ ऑगस्ट २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जी/दक्षिण विभागाच्या कार्य क्षेत्रातील महानगरपालिका जमिनीसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण यांना घोषित केलेले आहे.

उपरोक्त संदर्भानुसार तहसिलदार-१ विशेष कक्ष झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, यांनी गोमाता जनता सह. गृह. संस्था, (मर्या.) या पुर्नवसन इमारतीतील अनधिकृत व्यक्तिविरुध्द, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (ई) अन्वये, निष्कासनाची कारवाई करण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने,आपणांस कळविण्यात येते की, आपण गोमाता जनता सह.गृह.संस्था,(मर्या.), इमारत क्र.२ गाळा/सदनिका क्र.६०१ मध्ये अनधिकृत वास्तव्य करीत असल्याचे आढळल्याने आपणावर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (ई) अन्वये, निष्कासनाची कारवाई का करु नये? याबाबत सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी खुलासा सादर करावा. अथवा ४८ तासांच्या आत सदर सदनिका आपण स्वतःहून रिक्त करुन, सदर रिक्त गाळा/सदनिकेचा ताबा संबंधित वसाहत अधिकारी, यांच्याकडे सुपूर्द करावा.

अन्यथा, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) अन्वये, या कार्यालयाच्या यंत्रणेमार्फत, आपण वास्तव्य करीत असलेली इमारत क्र.२ सदनिका/गाळा क्र.६०१, पोलिस बंदोबस्तात सक्तीने रिक्त करुन गाळयाचा ताबा मिळविला जाईल व सदर कारवाई बाबत आलेल्या खर्चाची रक्कम आपल्याकडून जमीन महसूल कायद्यानुसार थकीत रक्कम म्हणून वसूल करण्यात येईल, या आशयाखाली आपण आणि श्री. **गंगाराम विरय्या बोगा** आणि **श्रीम. किशोरीताई पेडणेकर** यांना संदर्भ क्र. २ अन्वये नोटिस बजावण्यात आली होती. नोटिस

बजावण्याच्या वेळेस आपण प्रत्यक्ष स्थळी उपस्थित होता / उपस्थित नव्हता. त्यामुळे सदर नोटिस आपणावर बजावण्यात आली आहे / आपल्या सदनिकेवर / गाळयावर चिटकविण्यात आलेली आहे.

तदनंतर दि. ०२.१२.२०२२ रोजी मान. सहाय्यक आयुक्त यांच्या दालनात विषयास अनुसरुन सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर प्रथम सुनावणीचे पत्र आपणास दि. ३०.११.२०२२ रोजी बजावण्यात आलेले होते. परंतु सदर सुनावणीस आपण हजर होता / गैरहजर होता. आणि इतरही सदनिकाधारक / गाळाधारक सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने सदर सुनावणीचे कामकाज होऊ शकले नाही.

सदर सुनावणीसाठी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अनु क्र. | उपस्थितांचे नाव | पदनाम | उपस्थित/ गैरहजर |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र वि. मोहिते | वसाहत अधिकारी | |
| २. | श्री. कैलास पाटील | भाडे संकलक | |
| ३. | श्री. संजय महादेव अंधारी | | गैरहजर |
| ४. | श्री. गंगाधर बोमाय्या वडलाकोंडा | | गैरहजर |
| ५. | चुन्नीलाल बोधी पटेल | | गैरहजर |
| ६. | गंगाराम विरय्या बोगा | | उपस्थित |
| ७. | श्रीम. किशोरीताई पेडणेकर | | गैरहजर |
| ८. | किश कार्पोरेट स.प्रा.लि. | | गैरहजर |

वरीलप्रमाणे सुनावणी होऊ न शकल्याने दि. ०८.१२.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता दुसर्यांदा सुनावणी आयोजित करुन सुनावणीचे पत्र क्र. सआजीद/एसआर/७७४/वसाहत दि.०७.१२.२०२२ रोजी आपणास बजावण्यात आले आहे.

तदनुसार वरीलप्रमाणे सुनवाणी दि. ०८.१२.२०२२ दुपारी ०३.०० वाजता मान.सहाय्यक आयुक्त जी/द यांच्या दालनात ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीसाठी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अनु क्र. | उपस्थितांचे नाव | पदनाम | उपस्थित/ गैरहजर |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजेंद्र वि. मोहिते | वसाहत अधिकारी | |
| २. | श्री. धर्मेश जोशी | वकील | उपस्थित |
| ३. | श्री. सागर गंगाराम बोगा | | उपस्थित |
| ४. | श्री. संजय महादेव अंधारी | | उपस्थित |
| ५. | फुलचंद चुन्नीलाल पटेल | | उपस्थित |
| ६. | रोहित चव्हाण | | उपस्थित |
| ७. | अप्पु देवेंद्र | | उपस्थित |
| ८. | श्रीम. किशोरीताई पेडणेकर | | गैरहजर |
| ९. | किश कार्पोरेट स.प्रा.लि. | | गैरहजर |

वरीलप्रमाणे सुनावणी सुरु करताना मान.सहाय्यक आयुक्त जी/द यांनी **श्री. गंगाराम विरय्या बोगा** यांना विचारणा केली की, गोमाता नगर स.गृ.नि.संस्था , इमारत क्र. २, सदनिका /गाळा क्र. ६०१ हे आपणास झोपुप्रा कार्यालयाच्या वतीने वाटप करण्यात आले आहे. परंतु प्र. तहसिलदार -१ (विशेष कक्ष) झोपुप्रा यांच्या संदर्भित क्रमांक १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वितरणाच्या अटी व शर्तीनुसार वितरणाच्या १० वर्षांपर्यंत सदरची सदनिका ही कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करु शकत नाही किंवा सदर सदनिका गिफ्ट किंवा लिस स्वरुपात किंवा इतर वापराकरिता देऊ शकत नाही, असे नमुद असताना सदर सदनिकेचा वापर श्री. **गंगाराम विरय्या बोगा** यांनी स्वत: करणे आवश्यक होते. असे असतानाही सदरची सदनिका श्रीम. किशोरीताई पेडणेकर यांना रहावयास दिलेली असल्याचे श्रीम. किशोरीताई पेडणेकर यांनी नामनिर्देशन पत्रासोबत मुंबई महानगर पालिकेस दिलेल्या माहितीवरुन दिसुन येते. यावरुन श्री. **गंगाराम विरय्या बोगा** यांनी झोपुप्रा नियमांचे व वितरणाच्या अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याबाबत अहवाल सहनिबंधक सहकारी संस्था झोपुप्रा यांनी संदर्भिय पत्राने सादर केला आहे.

यास अनुसरुन आपण खुलासा सादर करावा असे उपस्थित सदनिकाधारक / गाळेधारक यांना सुचित केले. यावरुन संबधितांचे वकील श्री. धर्मेश जोशी यांनी असे नमुद केले की, माझे अशील श्री. **गंगाराम विरय्या बोगा** यांनी त्यांना मिळालेली सदनिका / गाळा हा **श्रीम. किशोरीताई पेडणेकर** यांना सन २००८ ते सन २०१९ पर्यंत भाडेतत्वावर दिलेला होता. आणि हस्तांतरित किंवा गिफ्ट किंवा लिस स्वरुपात दिलेला नसल्याने आपण बजाविलेल्या नोटिस मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वितरणाच्या अटी व शर्तीनुसार वितरणाच्या १० वर्षांपर्यंतच्या कालावधीचा चा कुठल्याही प्रकारचा दुरुउपयोग किंवा उल्लंघन केलेले नाही.

यानुसार माझे अशील यांच्यावर महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) अन्वये बजावण्यात आलेली नोटिस कायदयाला धरुन असल्याचे दिसुन येत नाही. म्हणुन सदर नोटिस रद्द करुन कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात येऊ नये.

यानुसार वरीलप्रमाणे वकील यांचे म्हणने सहाय्यक आयुक्त जी/द यांनी ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निष्कर्ष व आदेश पारित करण्यात आले.

## निष्कर्ष

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई यांच्या कार्यालयात झालेल्या सुनावणीमध्ये त्याचप्रमाणे दि. ०८.१२.२०२२ रोजी सहाय्यक आयुक्त जी/द यांच्या कार्यालयात झालेल्या सुनावणीमध्ये आपण स्वत: इमारत क्र. २, सदनिका / गाळा क्र. ६०१ ही श्रीम. किशोरीताई पेडणेकर यांना भाडेतत्वावर दिले असल्याचे लेखी व तोंडी स्वरुपात कबुल केलेले आहे. सबब सदनिकेचे वितरण झाल्यापासुन १० वर्षांच्या आत आपण सदर सदनिका / गाळाचा वापर स्वत:साठी न करता श्रीम. किशोरीताई पेडणेकर यांना वापरावयास दिलेली आहे.यास्तव आपणावर महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) अन्वये कारवाई करणे आवश्यक आहे.

## आदेश

श्री. गंगाराम विरय्या बोगा, ताबेदार यांनी हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ४८ तासांच्या आत इमारत क्र. २, सदनिका / गाळा क्र. ६०१ स्वत:हुन रिकामी करुन सदर सदनिका महापालिकेच्या ताब्यात द्यावी.तसेच मी असाही आदेश देत आहे की श्री. गंगाराम विरय्या बोगा, ताबेदार यांनी विहित मुदतीत सदनिका रिक्त करुन न दिल्यास त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(ई) अन्वये सक्तीच्या उपायाने झोपडी निष्कासन कारवाई करुन रिक्त सदनिकेचा ताबा महापालिके मार्फत मिळवला जाईल व सदर निष्कासन कारवाई कामी झालेला खर्च त्यांच्याकडुन वसुल करण्यात येईल.

**सहाय्यक आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**जी/दक्षिण**

प्रत रवाना

१. श्रीम. किशोरीताई पेडणेकर
इमारत क्र. २, सदनिका / गाळा क्र. ६०१. गोमाता जनता एस.आर.ए.सह.गृह.संस्था (मर्या.) लोअर परेल, मुंबई – ४०० ०१३.

२. प्र. तहसिलदार -१ (विशेष कक्ष) झोपुप्रा कार्यालय

३. सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, मुंबई शहर, झोपुप्रा, मुंबई.

४. झोपडीधारकांचे प्रतिनिधी
वकील श्री. धर्मेश जोशी.

**सहाय्यक आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**जी/दक्षिण**